सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमूद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.न्यायप्र-१०२२/प्र.क्र.२५१/पोल-५अ, दि.५ मे,२०२५

**विषय** :- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित,गट-ब(मुख्य) परीक्षा-२०१७ मधून पोलीस उप निरीक्षक पदावर नियुक्त करणेबाबत.

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.न्यायप्र-१०२२/प्र.क्र.२५१/पोल-५अ, दि.५ मे,२०२५, ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०५०५१६५३०८६२२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 08-05-2025 10:22:11

**( प्रविण शिखरे )**
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

अपर पोलीस महासंचालक (आस्थापना), महाराष्ट्र राज्य,मुंबई
अपर पोलीस महासंचालक,प्रशिक्षण व खास पथके,महाराष्ट्र राज्य मुंबई.
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन),महाराष्ट्र राज्य,मुंबई.
संचालक,महाराष्ट्र पोलीस अकादमी,नाशिक
विशेष पोलीस महानिरीक्षक, (आस्थापना), महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत:-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा- २०१७ मधून पोलीस उपनिरिक्षक पदावर नियुक्ती करणेबाबत ...**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : न्यायप्र- १०२२/प्र.क.२५१/पोल-५अ**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ०५ मे २०२५

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजराजपत्रित, गट-ब (मुख्य) (पोलीस उपनिरीक्षक) परीक्षा - २०१७ मध्ये ज्या मागास प्रवर्गातील उमेदवारांनी खुल्या प्रवर्गाच्या कट ऑफ गुणांपेक्षा जास्त गुण मिळविले आहेत त्यांना खुल्या प्रवर्गामध्ये दर्शवून सदर मागास प्रवर्गाच्या जागेवर संबंधित प्रवर्गातील उमेदवाराची शिफारस करण्याबाबत श्री. संदीप सुरेश माळी व इतर यांनी मा. उच्च न्यायालय,मुंबई येथे रिट याचिका क्र.१३३/२०२३ दाखल केली होती. सदर याचिकेच्या अनुषंगाने तपासणी करुन शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

मागास प्रवर्गातील उमेदवारांनी खुल्या प्रवर्गाच्या कट ऑफ गुणांपेक्षा जास्त गुण मिळविले आहेत त्यांना खुल्या प्रवर्गामधून नियुक्ती देण्याबाबतचे शासनाचे धोरण आहे. रिट याचिका क्र.१३३/२०२३ मध्ये उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने तपासणी केली असता याचिकाकर्त्यांनी केलेली मागणी योग्य असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे, महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजराजपत्रित, गट-ब (मुख्य) (पोलीस उपनिरीक्षक) परीक्षा- २०१७ मध्ये ज्या मागास प्रवर्गातील उमेदवारांनी खुल्या सर्वसाधारण प्रवर्गाच्या कट ऑफ गुणांपेक्षा जास्त गुण मिळविले आहेत त्यांना खुल्या सर्वसाधारण प्रवर्गामध्ये दर्शवून, मागास प्रवर्गाच्या जागेवर संबंधित प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

त्यानुसार खुल्या सर्वसाधारण (Open-General) प्रवर्गाच्या कट ऑफ गुणांपेक्षा जास्त गुण मिळविले आहेत अशा मागासप्रवर्गातील उमेदवारांना खुला सर्वसाधारण (Open-General) प्रवर्गामध्ये दर्शविल्यानंतर मागास प्रवर्गाच्या जागेवर संबंधित प्रवर्गातील खालील नमूद उमेदवारांची पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | गुणवत्ता यादीतील क्रमांक | बैठक क्रमांक | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | प्राप्त गुण | शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २६९ | AU005008 | सुखदेव गोपीनाथ राठोड | DT(A) | 237 | DT-A-General-1 |
| २ | ४३५ | PN008369 | व्याहाडकर पुंडलिक मारोती | OBC | 231 | OBC-General-60 |
| ३ | ४३७ | PN006129 | माळी संदीप सुरेश | OBC | 231 | OBC-General-61 |
| ४ | ४३८ | AU002075 | सयद हबीब रशीदमियां | OBC | 231 | OBC-General-62 |
| ५ | ४४१ | PN001391 | यादव अमोल विठ्ठल | OBC | 231 | Against OBC-Sports-1 |
| ६ | ४४४ | AU001035 | आगरकर स्वरूप सिताराम | OBC | 231 | Against OBC-Sports-2 |
| ७ | ४४५ | PN012340 | हिंगे स्वप्नील मच्छिंद्र | OBC | 231 | Against OBC-Sports-3 |
| ८ | ४४६ | AU003331 | कुंभार रामकिसन दगडू | OBC | 231 | Against OBC-Sports-4 |
| ९ | ४४७ | PN010096 | सैपन मौला नदाफ | OBC | 231 | Against OBC-Sports-5 |

२. उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती त्यांनी आवेदन अर्जामध्ये केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने विहित वयोमर्यादा, विहित केलेली आवश्यक शैक्षणिक अर्हता, मराठीचे ज्ञान, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (NCL Certificate) तसेच सामाजिक व समांतर आरक्षण विषयक दावे, नियुक्तीपूर्वी शासनाच्या विहित/सक्षम प्राधिका-याकडून मुळ प्रमाणपत्रांआधारे त्यांची वैधता /सत्यासत्यता तपासण्याच्या अटींच्या अधीन राहून करण्यात येत आहे. सदर तपासणीत तसेच ओळखपत्र पडताळणीत पात्र ठरल्यासच त्यांना नियुक्ती देण्यात येईल.

३. उमेदवारांनी आवेदनपत्रामध्ये दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता न केल्यास, शासन स्तरवर अधिसूचनेतील तरतुदीनुसार मुळ कागदपत्राच्या आधारे दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरल्यास त्यांची नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

४. उमेदवारांनी सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२८.०८.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या साक्षांकन नमून्यामध्ये माहिती भरुन सदर साक्षांकन नमूना प्रधान सचिव (अ. व सु.), गृह विभाग (पोल-५अ),मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई - ४०००३२ यांचाकडे सादर करावा. साक्षांकन नमून्यातील रकाना क्रमांक १५ मध्ये अटक, शिक्षा, दंड व इतर कारवाई झाली असल्याबाबतची माहिती “होय” किंवा “नाही” अशी भरावी. संबंधित रकाना कोरा ठेवल्यास किंवा नुसती रेघ मारल्यास असा साक्षांकन नमुना स्वीकारण्यात येणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

५. उमेदवारांनी ओळखपत्राची स्वसाक्षांकीत छायांकित प्रत, आधारकार्डची छायांकीत प्रत, शौक्षणिक अर्हतेबाबतची आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्र,मागासवर्गीय उमेदवार असल्यास जातीच्या दाव्याबाबतची प्रमाणपत्र/कागदपत्र, आवश्यकतेनुसार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (NCL),इतर आवश्यक कागदपत्रांच्या छायांकीत प्रती प्रधान सचिव (अ. व सु.), गृह विभाग, (पोल-५अ) यांच्याकडे सादर काराव्यात.

६. उपरोक्त उमेदवारांच्या नियुक्तीमुळे अतिरिक्त ठरणा-या उमेदवारांसाठी स्वतंत्रपणे अधिसंख्य पदे निर्माण करण्यात येतील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०५०५१६५३०८६२२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUGRIV SAMBHAJI DHAPATE

Digitally signed by SUGRIV SAMBHAJI DHAPATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=FC102DE27DC1B41E747AC6CBB491C4209459C3CF340720EA98FD1D95B19C9F65, cn=SUGRIV SAMBHAJI DHAPATE
Date: 2025.05.05 16:53:45 +05'30'

**( सुग्रिव धपाटे )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. अपर पोलीस महासंचालक (आस्थापना/प्रशासन), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
४. विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
५. संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
६. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र -१, मुंबई
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
९. निवडनस्ती (पोल-५अ)